**नि.दि.मु.क्र.६१/२०२२ मधील निशाणी क्र.७७ वरील आदेश**

**(CNRNo.MHSI080004222022)**

०१. प्रतिवादी क्र.८ ते ११ यांनी प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार कैफियतीत दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. अर्ज, वादीचे नि.क्र.७९ वरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र.८ ते ११ यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी नि.क्र.७१ येथे वादीचे दाव्यास कैफियत दाखल केली आहे. तसेच प्रतिवादी क्र.११ यांनी नि.क्र.७५ येथे पुरशिस दाखल करुन प्रतिवादी क्र.८ ते १० यांचे कैफियतप्रमाणे त्यांची कैफियत असल्याबाबत कथन केले आहे. प्रतिवादी क्र.८ ते १० यांच्या कैफियतीती काही टंकलेखन दोषामुळे चुका झाल्या आहेत. कैफियतीमधील परीच्छेद क्र.१० मधील सातव्या ओळीतील स.नं.१५२, स.नं.१५२, स.नं.१६२, स.नं.१८०, स.नं.१८३ व आठव्या ओळीतील स.नं.१८३, स.नं.१८४, स.नं.१८४ हे अंक खोडून त्याएवजी अनुक्रमे स.नं.२५२, स.नं.२५२, स.नं.२६२, स.नं.२८०, स.नं.२८३, स.नं.२८३, स.नं.२८४, स.नं.२८४ असे लिहण्यास परवानगी मिळणेबाबती विनंती केली आहे. सदर दुरुस्ती ही कीरकोळ स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीने कैफियतीच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार

नाही. तसेच सदर दुरुस्तीमुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचे कामी होणारी संदीग्धता टाळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, प्रस्तूत प्रतिवादी क्र.८ ते ११ यांनी कैफियतीमध्ये दुरुस्तीस परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

०३. वादी यांनी सदर अर्जास नि.क्र.७९ वर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. वादीच्या कथनानुसार, प्रस्तूत अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रस्तूत अर्जास संयुक्तिक व कायदेशीर कारण दिलेले नाही. प्रतिवादी क्र.११ यांनी प्रस्तूत कामी कोणतीही कैफियत दिलेली नाही. अशा परीस्थितीत कैफियत दुरुस्तीसाठी विनंती करण्याचा प्रतिवादी क्र.११ यांना कोणताही हक्क व अधिकार नाही. नि.क्र.७७ वरील अर्जात दिलेली कारणे कैफियत दुरुस्ती करण्यास योग्य नाही. प्रतिवादींनी सुचवलेल्या दुरुस्तीमध्ये मुळ कैफियतीत दिलेले मिळकतींचे सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर हे संयुक्तपणे एक एकक असूनही त्यात केवळ सर्व्हे नंबरची दुरुस्ती सुचवलेली आहे. सदर दुरुस्ती ही तांत्रीकदृष्ट्या चुकीची व बेकायदेशीर आहे. वादीने सदर अर्ज दाव्यास विलंब होण्याकरीता केला आहे. सबब अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०४. प्रस्तूत दावा हा वादीने वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रकरणी प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी नि.क्र.७१ प्रमाणे आपली कैफियत दाखल केली आहे. तसेच, प्रतिवादी क्र. ११ यांनी नि.क्र.७५ प्रमाणे पुरशिस दाखल

करुन प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी दिलेल्या कैफियतीप्रमाणे त्यांची कैफियत असल्याचे कथन केले आहे. वादीने आपल्या दाव्यात दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे पुर्वाधिकारी आकाराम रावराणे यांचेपासून चालत आलेल्या एकत्र कुटुंबाच्या सामाईक मालकी कब्जा वहिवाटीच्या मिळकती आहेत असे कथन केले आहे. त्यानुसार, प्रतिवादी क्र.८ ते १० यांनी आपल्या कैफियतीत सदर दावा मिळकतींचा आचिर्णे, ता.वैभववाडी येथील फेरफार क्र.१७३२ नुसार जुना सर्व्हे नंबर नमुद केला असून सदर बाब वादीने पूर्ण दाव्यामध्ये कोठेही नमुद केलेली नाही असे कथन केले आहे. प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी नमुद केले की, त्यांना फक्त सर्व्हे नंबर दुरुस्त करावयाचे आहेत. कैफियतमधील परीच्छेद क्र.१० मधील सातव्या ओळीमधील हिस्सा क्रमांक बरोबर आहेत. त्यामुळे, दावा व प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्यात कोणताही बदल संभवत नाही. याउलट, वादीचे कथन व प्रतिवादीची कैफियत यामधील सर्व निर्णायक मुद्दे निकाली काढण्यास मदत होणार आहे. प्रस्तूत प्रतिवादींना प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तूत दाव्याचे व कैफियतीचे स्वरुप बदलणार नाही. त्यामुळे, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज नि.क्र.७७ हा मंजूर करणे योग्य वाटते. परंतू, प्रतिवादी क्र.८ ते ११ यांनी केलेल्या विलंबाबाबत वादी यांना खर्च देणेबाबतचा आदेश करणे योग्य होईल. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आ दे श –**

०१. निशाणी क्र. ७७ वरील अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.०८ ते ११ यांनी झालेल्या विलंबाबत रक्कम रु.५००/–(रुपये पाचशे मात्र) वादीस द्यावेत.

०३. प्रतिवादी क्र.८ ते ११ यांनी अर्जात नमुद केलेली प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसाच्या आत करावी व कैफियतीची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.04.12 11:05:06 +0530

(टी.एच. शेख)

दिनांकः १०/०४/२०२४

न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी.